मुख्य कार्यालय, विरार
विरार (प),
ता.वसई, जि.पालघर - ४०१३०३.

दूरध्वनी : ०२५० - २५२५१०१/ ०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५० - २५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com
जावक क्र. : व.वि.श.म./क्रीडा/८१/२०२४-२५
दिनांक : ०८/०८/२०२४

**जाहीर आवाहन**

स्थानिक खेळाडुंसह देशभरातील धावपट्टूंना राज्य,राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडुंच्या समवेत खेळण्याची संधी मिळावी, त्यांच्या कामगिरीची दखल घेता यावी , नागरीकांमध्ये व्यायामाची आवड निर्माण व्हावी व त्यांचा खेळातील सहभाग वाढावा, विविध स्तरावरील धावपट्टूंना त्यांचे कौशल्य दाखविण्याची संधी प्राप्त व्हावी व त्यांच्या अंगभूत कौशल्याचा यथोचित सन्मान व्हावा यासाठी दरवर्षी महानगरपालिके मार्फत राष्ट्रीय वसई विरार महानगरपालिका मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन केले जाते.

या स्पर्धेमध्ये दरवर्षी संपुर्ण भारतातुन एकूण १७ विविध स्पर्धा प्रकारात अंदाजीत १५ हजाराहून अधिक स्पर्धक भाग घेत असतात. यावर्षी मॅरेथॉन स्पर्धेचे हे १२ वे वर्ष असून या स्पर्धेत स्पर्धकांचा सहभाग वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

राष्ट्रीय स्तरीय मॅरेथॉन स्पर्धेचे नियोजन हे व्यापक स्वरुपाचे असल्याने क्रीडा क्षेत्रातील क्रीडा संस्था/संघटना/ मंडळे यांचा सहभाग घेवून त्यांच्या संयुक्त विद्यमाने मॅरेथॉन स्पर्धाचे आयोजन करणेसाठी वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील इच्छूक व अनुभवी क्रीडा संस्था/संघटना/ मंडळे यांनी खालील अटी व शर्तीस अधिन राहून नमूद कागदपत्रे सिलबंद लिफाफा मध्ये वसई विरार शहर महानगरापालिका,नवीन प्रशासकीय इमारत,विराट नगर,आवक-जावक विभाग,विरार (पश्चिम) येथे समक्ष सादर करावीत,असे जाहीर आवाहन करण्यात येत आहे.

**सर्वसाधारण अटी व शर्ती**

१) क्रीडा संस्था/संघटना/ मंडळे यांचे धर्मदाय आयुक्त यांचेकडे संस्था नोंदणी अधिनियम,१८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम,१९५० अन्वये नोंदणी प्रमाणपत्र असावे.

२) क्रीडा संस्था/संघटना/ मंडळे यांच्या गतवर्षाच्या लेखाविवरण पत्राची स्वाक्षरीत प्रत.

३) क्रीडा संस्था/संघटना/ मंडळे यांनी या अगोदर राज्य, जिल्हा व तालुका स्तरावर स्पर्धांचे आयोजन केल्याचा कार्य अहवालाची छायांकित प्रत.

४) क्रीडा संस्था/संघटना/ मंडळे यांनी या अगोदर आयोजित केलेल्या राज्यस्तरीय/जिल्हास्तरीय/तालुका स्तरीय या स्पर्धेमध्ये सांघिक क्रीडा स्पर्धा व वैयक्तीक क्रीडा स्पर्धा मध्ये सुमारे १५००० हून अधिक स्पर्धकांचा समावेश झालेल्या स्पर्धा आयोजन केल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.

५) क्रीडा संस्था/संघटना/ मंडळे यांचेकडे १००० हून अधिक स्वयंसेवक/ऑफिशल्स असल्याचे रु.५०० च्या स्टॅम्पपेपरवरील हमीपत्र.

६) क्रीडा संस्था/संघटना/ मंडळे यांच्या मार्फत सातत्याने आयोजित केलेल्या स्पर्धेच्या माध्यमातून राज्य, राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडूंची यादी क्रीडा संस्था/संघटना/मंडळांचे अध्यक्ष व सचिव यांची शाईची स्वाक्षरी व शिक्का असलेली प्रत.

७) या कामी क्रीडा संस्था/संघटना/ मंडळे यांना कोणताही आर्थिक मोबदला महानगरपालिकेकडून दिला जाणार नाही.

८) वरील अटींमध्ये बदल करण्याचे अधिकार महानगरपालिकेस राहतील.

९) नमूद कागदपत्रे दिनांक.०९/०८/२०२४ ते दिनांक.२८/०८/२०२४ या कालावधीत सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.३० वाजे पर्यंत सिलबंद लिफाफ्यात नवीन प्रशासकीय इमारत,वसई विरार शहर महानगरापालिका,आवक-जावक विभाग,तिसरा मजला,विराट नगर (विरार पश्चिम) येथे समक्ष सादर करावीत.

१०) विहित मुदती नंतर आलेले प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत.

सही/-
(संजय हेरवाडे)
अतिरिक्त आयुक्त (क्रीडा विभाग)
वसई विरार शहर महानगरपालिका

(मा.आयुक्त सो यांच्या मान्यतेने)